दै.रजि. नं.      /२०२६
फिर्याद दा.ता. ३०/०३/२०२६

Exh.1/C

समरी क्रि.के.नं.      /२०२६

## मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल
## यांचे कोर्टात ....

**श्री.तानाजी निवृत्ती लोंढे,**
व.व. ३६, धंदा – बांधकाम व्यवसायीक,
रा. अर्जुनी, ता. कागल, जि. कोल्हापूर
} फिर्यादी

विरूद्ध

Order ----------------------

**श्री.प्रमोद धोंडीराम वाडकर,**
व.व.३४, धंदा – सिव्हील इंजिनियर
रा. चौगुले अड्डा नानीबाई चिखली,
ता. कागल, जि. कोल्हापूर
} आरोपी

**निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ॲक्ट कलम १३८**
**व बी.एन.एस.३१८(४) प्रमाणे फिर्याद :**

**यातील फिर्यादी यांची फिर्याद अशी की,**

१) यातील फिर्यादी हे बांधकाम व्यावसायीक आहेत. यातील आरोपी हे सिव्हील इंजिनिअर असून त्यांचे चौगुले अड्डा, नानीबाई चिखली, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे आर.सी.सी. घराचे बांधकाम करावयाचे होते.

फिर्यादी हे बांधकाम व्यावसायिक असलेचे आरोपी यांना माहिती असलेमुळे आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडून बांधकाम करून घेणेचे ठरविले. त्यानुसार आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये सदर बांधकामाबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानुसार फिर्यादी यांनी आरोपी यांनी सांगितलेप्रमाणे आर.सी.सी बांधकाम पूर्ण करून दिलेले आहे. सदर आर.सी.सी. बांधकामाचे मजुरीची रक्कम रू. १०,२८,०००/– (रू. दहा लाख अठ्ठावीस हजार फक्त) इतकी रक्कम झालेली होती. आरोपी यांनी फिर्यादी यांना अंतिमतः दि. २१/०६/२०२३ इ. रोजी रक्कम रू. १,००,०००/– अदा केलेली आहे. त्यानुसार वेळोवेळी आरोपी यांनी फिर्यादी यांना एकूण रक्कम रू. ८,८३,०००/– (रू. आठ लाख त्र्याऐंशी हजार) इतकी रक्कम अदा केलेली आहे. सदरची रक्कम देतेवेळी व तद्नंतर आरोपी यांनी उर्वरित रक्कम आर्थिक अडचणीमुळे लवकरच अदा करणेबाबत ग्वाही दिली होती. तथापि, उर्वरित रक्कम रू. १,४५,०००/– (रू. एक लाख पंचेचाळीस हजार) ही अद्याप ही आरोपी यांचेकडून फिर्यादी यांना देय आहे.

२) आरोपी यांनी फिर्यादी यांची देय असणारी कायदेशीर रक्कम रू. १,४५,०००/– (एक लाख पंचेचाळीस हजार फक्त) ही फिर्यादी यांनी आरोपी यांचेकडे वेळोवेळी मागणी करूनही सदरची रक्कम देणेस आरोपी यांनी टाळाटाळ केलेली होती. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपी यांचेकडे सदर कायदेशीर रक्कमेच्या मागणीचा तगादा आरोपी यांचेकडे लावलेमुळे आरोपी यांनी फिर्यादी यांना रक्कम रू. १,२५,०००/– इतक्या रक्कमेचा कर्णाटक बॅंक लि., शाखा : निप्पाणी चा सही केलेला दि. १४/११/२०२५ इ. रोजीचा धनादेश नं. ०३०२९८ हा फिर्यादी यांना दिला. सदर धनादेश देतेवळी आरोपी यांनी फिर्यादी यांना त्यांचे खातेवर चेक वटणेइतकी रक्कम

ठेवलेची हमी व खात्री देवून सदर धनादेश वटणावळीस दिलेस सदर धनादेश वटणेची हमी व खात्री फिर्यादी यांना दिली होती.

३) सदरचा धनादेश देतेवेळी आरोपी यांस माहिती आणि ज्ञान होते की, सदरचा धनादेश तारखेस सदर खातेवर कोणतीही रक्कम असणार नाही आणि सदरचा धनादेश वटणार नाही. तथापि, सदरचे कायदेशीर देणेपोटी न वटणारा धनादेश देवून त्याद्वारे फिर्यादी यांचा गैरवाजवी तोटा करून स्वत:चा गैरवाजवी फायदा करून घेणेचा आरोपी यांचा उद्देश असलेमुळे आरोपी यांचे खातेवर पुरेशी रक्कम असेल असा खोटा आभास आरोपी यांनी फिर्यादी यांचेसमोर निर्माण केला आणि सदर कायदेशीर देणेपोटी सदरचा धनादेश घेणेस उद्युक्त केले. तथापि, सदरचा धनादेश वटविणेचा कोणताही हेतू आरोपी यांचे मनामध्ये सदरचा धनादेश देतेवेळेस नव्हता. आरोपी यांनी फिर्यादी यांचेसमोर सदरचा धनादेश वटणेइतकी रक्कम आरोपी यांचे खातेवर असेल असा आभास निर्माण केलेमुळे आणि तो आभास खरा आहे असे फिर्यादी यांना वाटलेमुळे सदरचा धनादेश फिर्यादी यांनी आरोपी यांचेकडून स्विकारला.

४) फिर्यादी यांनी आरोपी यांचेवर विश्वास ठेवून सदरचा धनादेश वटणेसाठी आपले खाते असलेल्या बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा : खडकेवाडा, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे भरला असता, सदरचा धनादेश 'Funds Insufficient' या शे–यानिशी दि. ०२/०२/२०२६ इ. रोजी न वटता दि. ०३/०२/२०२६ इ. रोजी प्रिंट होवून रिटर्न मेमोसह परत आलेला आहे. आरोपी यांनी फिर्यादी यांना सदरचा धनादेश वटेल अशी खात्री व हमी दिलेली होती. तथापि, आरोपी यांनी त्यांचे खातेवर पुरेशी रक्कम न ठेवता फिर्यादी यांची घोर फसवणूक केलेली आहे.

५) तद्नंतर, यातील फिर्यादी यांनी त्यांचे वकील अॅड. व्ही. एम. हंचनाळे यांचेमार्फत आरोपी यांना दि. १६/०२/२०२६ इ. रोजी रजि. पोस्टाने नोटीस पाठवून फिर्यादी यांनी आरोपी यांना दिलेला धनादेश न वटलेबाबत कळविले होते. सदरची नोटीस ही आरोपी यांना दि. १७/०२/२०२६ इ. रोजी लागू झालेली आहे. मात्र सदर कायदेशीर देय लागत असलेली वर नमूद धनादेशातील रक्कम आजतागायत फिर्यादींना दिलेली नाही. त्यामुळे फिर्यादी यांना प्रस्तूतची फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

६) यातील आरोपी यांनी फिर्यादी यांची कायदेशीर देय असलेल्या रक्कमेपोटी रू. १,२५,०००/— (एक लाख पंचवीस हजार फक्त) चा न वटणारा धनादेश देवून फिर्यादी यांची निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट कलम १३८ व बी.एन.एस. कलम ३१८(४) प्रमाणे घोर फसवणूक केलेली आहे. आरोपीने जाणूनबुजून फिर्यादी यांची रक्कम बुडविण्याच्या हेतूने व त्यांची फसवणूक करणेच्या दृष्टीने वरील धनादेश दिलेला आहे. अशा प्रकारे आरोपीने फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केलेली आहे. त्यामुळे सदरची फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

७) **फिर्यादीस कारण :**

यातील आरोपीने फिर्यादी यांचे कायदेशीर देणे रक्कम रू. १,४५,०००/— (एक लाख पंचेचाळीस हजार फक्त) इतक्या रक्कमेपैकी रक्कम रू. १,२५,०००/— (एक लाख पंचवीस हजार फक्त) इतक्या रक्कमेचा कर्णाटक बॅंक लि., शाखा : निपाणी चा सही केलेला दि. १४/११/२०२५ (चौदा नोव्हेंबर दोन हजार पंचवीस) इ. रोजीचा धनादेश नं. ०३०२९८ हा फिर्यादी यांना दिला. सदरचा धनादेश फिर्यादीने दि. ०२/०२/२०२६(दोन फेब्रुवारी दोन हजार सव्वीस)इ. रोजी आपले खात्यावर भरला असता सदरचा धनादेश **'फंड्स इनसफिशिएंट'** या

शे–यानिशी न वटता दि. ०३/०२/२०२६ (तीन फेब्रुवारी दोन हजार सव्वीस) इ. रोजी अनादर होवून परत आला. त्यानंतर फिर्यादीने आपल्या वकीलांमार्फत दि. १६/०२/२०२६ (सोळा फेब्रुवारी दोन हजार सव्वीस) इ. रोजी धनादेश अनादर झालेबाबतची व धनादेशामधील रक्कमेची मागणी करणारी नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीस दि. १७/०२/२०२६ इ. रोजी लागू झालेली आहे. तथापि, आरोपीने फिर्यादी यांची कायदेशीर देय रक्कम आजतागायत दिलेली नाही. त्यामुळे दि. ०५/०३/२०२६ इ. रोजी फिर्यादीस कारण घडलेले आहे व घडत आहे.

८) <u>मुदत :</u>

फिर्यादी यांनी आरोपी यांना पाठविलेली अनादर धनादेशाची रक्कम मागणीची नोटीस आरोपीस दि. १६/०२/२०२६ इ. रोजी पाठविलेली आहे. सदरची नोटीस आरोपीस दि. १७/०२/२०२६ इ. रोजी लागू झालेली आहे. त्यामुळे दि. ०५/०३/२०२६ इ. रोजी फिर्यादीस कारण घडले आहे. त्यामुळे प्रस्तूतची फिर्याद आजरोजी मुदतीत दाखल केलेली आहे.

९) **<u>अधिकार क्षेत्र :</u>**

यातील फिर्यादी यांनी आरोपी यांचे बांधकाम चौगुले अड्डा, नानीबाई चिखली, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे केले असून, सदर धनादेश बाबतचा संपूर्ण व्यवहार मे. कोर्टाच्या स्थलसिमेत घडला आहे. तसेच फिर्यादीचे खाते असलेली बँक ही मे. न्यायालयाचे स्थलसिमेत आहे. त्यामुळे प्रस्तूत फिर्याद चालविणेचा व निर्णय देणेचा या मे. कोर्टाना पूर्ण अधिकार आहे.

१०) फिर्यादीने आरोपीविरूध्द सदर धनादेशबाबतची फिर्याद अन्य कोणत्याही कोर्टात दाखल केलेली नाही अगर प्रलंबित नाही.

११) **सबब फिर्यादीची विनंती की,**

अ. आरोपी याने केलेल्या अपराधाची चौकशी व्हावी आणि कायद्यातील तरतुदीनुसार आरोपीस कडक शासन व्हावे.

ब. फिर्यादीस आरोपीकडून धनादेशाच्या दुप्पट रक्कम नुकसान भरपाई मिळावी.

क. न्यायाचे अन्य हुकूम फिर्यादी यांचे बाजूने व्हावेत.

येणेप्रमाणे फिर्याद असे.

कागल
दि. ३०/०३/२०२६

(फिर्यादी)

फिर्यादी यांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून
फिर्याद तयार करून दाखल करणार

**ॲड. व्ही.एम.हंचनाळे**

**यासी पुरावा :**

**तोंडी पुरावा :**

१. फिर्यादी स्वत:

२. बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा : खडकेवाडा येथील संबंधीत अधिकारी

३. कर्नाटक बॅक लि., शाखा : निपाणी येथील संबंधीत अधिकारी

४. कागल येथील पोस्ट कार्यालयातील संबंधीत पोस्ट कर्मचारी व अधिकारी

५. पिंपळगाव खुर्द व नानीबाई चिखली येथील पोस्टमन

७. अन्य तोंडी पुरावा आहे. जरूर तर हजर करणेस फिर्यादी तयार आहेत.

**कागदोपत्री पुरावा :**

१. आरोपी यांनी फिर्यादी यांना दिलेला धनादेश

२. धनादेश न वटता परत आलेबाबत धनादेश रिटर्न मेमो

३. फिर्यादी यांनी आरोपी यांना वकिलांमार्फत पाठविलेली नोटीस

४. सदर नोटीस रजि. पोस्टाने पाठविलेबाबत पोस्टाची पावती.

५. आरोपी यांना नोटीस पोहोचलेची पोस्टाची पोहोच पावती

६. अन्य लेखी पुरावा आहे. जरूर तर हजर करणेस फिर्यादी तयार आहेत.

( फिर्यादी )

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.08 15:50:44 +0900